(८)

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये दुरुस्ती आदेश

4129 जा.क्र.वि३/२५इडीएफोर्सएकोऑपक्रेसो/प्रा.अ.मं.नि./दु.आ/१७
उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक यांचे कार्यालय, सहकार संकुल, नॅशनल ऊर्दू हायस्कूल जवळ, सारडा सर्कल, नाशिक.
दिनांक ०८/१२/२०१७

**वाचावे :-** १) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र वि-३/२५इडीएफोकोऑपक्रेसो/प्रा.अ.नि./आ/१७ दि.१८/९/२०१७.
२) श्री सुरेश लक्ष्मण गायकवाड यांचा अर्ज दि.४/१२/२०१७

ज्याअर्थी, २५ ईडी एअर फोर्स एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.साऊथ देवळाली ता.जि.नाशिक ही संस्था (जिचा उल्लेख यापुढे 'संस्था' असा केला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अन्वये (ज्याचा उल्लेख या पुढे 'अधिनियम' व 'नियम' असा केला आहे) नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे. संस्था व्यवस्थापनाने संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम व मंजुर उपविधीतील तरतुदी नुसार चालविणे बंधनकारक आहे.

२/- ज्याअर्थी, उक्त वाचावे क्रमांक ०२ अन्वये या कार्यालयाचे असे निदर्शनास आणून दिलेले आहे की, संस्थेचे संचालक यांनी राजिनामे दिलेले असल्याने या कार्यालयाने प्राधिकृत अधिकारी म्हणुन श्री एल.एम.गमे,सहाय्यक सहकार अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.मात्र प्राधिकृत अधिकारी यांना शासकीय कामकाजाच्या व्यापामुळे संस्थेसाठी पुर्ण वेळ देणे शक्य नाही.सदर संस्थेची सभासद संख्या विचारात घेता संस्थेच्या मुख्यालयातील अन्य ३ कर्मचारी यांची सहाय्यक प्राधिकृत अधिकारी म्हणुन प्राधिकृत मंडळ नियुक्त करण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे.

३/- ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) (१-अ) (ब-१) मधील तरतुदी नुसार, संस्थेच्या समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापना मध्ये पोकळी निर्माण झाली आहे, अशा परिस्थितीत संस्थेचा कारभार चालविण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्त करण्याची तरतुद आहे. सदर तरतुद नमुद संस्थेच्या बाबतीत प्रभावीत होत असल्याने, नमुद संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे व प्राधिकृत अधिकाऱ्या करवी संस्थेची नविन समिती गठीत करणे संस्थेच्या व सभासदाच्या हिताचे होईल, अशी या कार्यालयाची धारणा झालेली आहे.

४/- त्याअर्थी, नमूद संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

२५ ईडी एअर फोर्स एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.साऊथ देवळाली ता.जि.नाशिक या संस्थेच्या कामकाजामध्ये अडचण निर्माण होवु नये म्हणुन संस्थेचे कामकाज सुरळीत होणेकामी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुदीचा वापर करुन नमुद संस्थेचा कारभार चालविण्यासाठी खालील

१. श्री आर.सी.गजरे - अध्यक्ष
२. श्री संजय काशिनाथ पवार - सहाय्यक
३. श्री राजाराम बहिरु शिंगोटे - सहाय्यक
४. श्री सुरेश लक्ष्मण गायकवाड- सहाय्यक

प्राधिकृत अधिकाऱ्यांने संस्थेच्या समितीची निवडणूक प्रक्रिया पदभार स्विकारले पासुन तीन महिन्याच्या आंत राबविणे कामी मतदार याद्या मुदतीत या कार्यालयाकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दिनांक ०८/१२/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयिन मुद्रेसह दिला असे.

( संजय गिते )
उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.

दिनांक ०८/१२/२०१७
ठिकाण नाशिक.

**प्रति,**

१) माजी चेअरमन / संचालक / सचिव, २५ ईडी एअर फोर्स एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.साऊथ देवळाली ता.जि.नाशिक

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, संस्थेचे दप्तर व व्यवस्थापन प्राधिकृत अधिकाऱ्याकडे चार्ज यादीसह सुपूर्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) श्री. एल.एम.गमे, प्राधिकृत अधिकारी, २५ ईडी एअर फोर्स एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.साऊथ देवळाली ता.जि.नाशिक

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांचेकडील संस्थेच्या कामाकाजाचा पदभार कमी करण्यात येत आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

३) श्री आर.सी.गजरे,अध्यक्ष प्राधिकृत अधिकारी मंडळ,
४) श्री संजय काशिनाथ पवार - सहाय्यक प्राधिकृत अधिकारी ,
५) श्री राजाराम बहिरु शिंगोटे - सहाय्यक प्राधिकृत अधिकारी,
६) श्री सुरेश लक्ष्मण गायकवाड- सहाय्यक, प्राधिकृत अधिकारी,

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या कामाकाजाचा पदभार स्विकारुन व सुचना प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

**<u>प्रत माहितीस्तव :-</u>**

१) शाखाधिकारी, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नाशिक शाखा

उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.